▶ वर्ष–३
■ अंक–२५

# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २२ जानेवारी २०२४ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com



दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २२ जानेवारी २०२४ | पान : २

## रामलल्ला प्राणप्रतिष्ठा निमित्त सामाजिक उपक्रम

**ठाणे :** धार्मिक भावनेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने रामलल्ला प्राणप्रतिष्ठेच्या निमित्ताने लोढा लक्ष्मीरिया गृहनिमाण संकुलातील दानशूर व्यापारी जेठामल व मनोजकुमार दुधाणी यांनी गृहसंकुलातील सफाई कर्मचारी घरकाम करणाऱ्या महिला, सुरक्षा रक्षक व आदी ५०० कर्मचाऱ्यांना गरम कपडे व दीप यांचे वाटप केले.

संपूर्ण देशभरात रामलल्ला प्राणप्रतिष्ठेचा सोहळा साजरा केला जात आहे. यानिमित्ताने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. प्रभू राम चंद्रांच्या प्रेरणेने सामाजिक बांधिलकी लक्षात घेता लोढा लक्ष्मीरिया येथील दानशूर व्यापारी जेटामल व मनोजकुमार दुधाणी यांनी संकुलातील ५०० कर्मचाऱ्यांना गरम कपडे व दीप वाटप केले. गृहसंकुलातील सफाई कामगार, घरकाम करणाऱ्या महिला सुरक्षा रक्षक, बागकाम करणारे कर्मचारी अशांना उपयोगी वस्तूंचे वाटप केले. धार्मिक भावनेबरोबर सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न यानिमित्ताने दुधाणी कुटुंबियांनी जपला.




## दिव्यात बहुजन समाज पार्टीच्या कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडी पक्षात प्रवेश

**ठाणे:–** दिवा शहरातील बहुजन समाज पार्टीच्या कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडी पक्षात जाहीर प्रवेश केला.वंचित बहुजन आघाडी येणाऱ्या लोकसभा, विधानसभा व ठाणे महानगर पालिका निवडणुका जिंकण्यासाठी मोर्चे बांधणी करत आहे. या पक्षप्रवेशावेळी संजय जाधव, रवींद्र वाघ, नितेश इंगोले,रुपेश कांबळे,अरविंद कदम, संदेश पाटणे, नंदन खैरे, प्रमोद मोहिते, विवेक कदम,रोहित जाधव, जिग्नेश गरुड, शारदा धनवे, रुपाली कांबळे, रेखा कांबळे, रेश्मा बल्लाड, दिपाली वाघ, गीता भालेराव, पूजा भालेराव गायकवाड, मॅडम. शितल कांबळे , आणि महिला कार्यकर्ते व पदाधिकारी व मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाण्याला दोन सुवर्ण पदकासह सात पदके

**ठाणे:** नागपूर येथे १३ ते १५ जानेवारी दरम्यान पार पडलेल्या महाराष्ट्र आंतरविद्यापीठ खेळ २०२३-२४ या ऍथलेटिक्स स्पर्धेत ठाणे महापालिकेच्या प्रशिक्षण योजनेअंतर्गत सराव करणाऱ्या तीन खेळाडूंनी सात पदकांची कमाई केली आहे. यामध्ये दोन सुवर्ण पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेच्या पुरुष गटात निखिल ढाके याने सर्वोत्कृष्ट ॲथलीट म्हणून किताब पटकावला आहे.

महाराष्ट्र आंतरविद्यापीठ खेळ २०२३-२४ या स्पर्धेत निखिल ढाके याने ४०० मीटरमध्ये सुवर्णपदक, २०० मीटरमध्ये रौप्यपदक आणि ४ ४०० मीटरमध्ये कांस्यपदक मिळवले. ४०० मीटरमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल निखिलला पुरुष गटातील सर्वोत्कृष्ट ॲथलीट म्हणून घोषित करण्यात आले. आकांक्षा गावडे हिने २०० मीटरमध्ये सुवर्णपदक आणि ४०० मीटरमध्ये रौप्य पदक या दोन्ही स्पर्धांमध्ये अतिशय चांगल्या फरकाने वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी केली. अदिती पाटील हीने ४ ४०० मीटर रिले आणि ४ १०० मीटर रिलेमध्ये कांस्यपदक मिळवले.




## उलटलेल्या ट्रेलरने रोखला मुंब्रा बायपास रोड; चालकही जखमी



**ठाणे:** ट्रेलर मधून ३१ टन वजनाची लोखंडी प्लेट घेऊन जाताना राजस्थान येथील चालक बुदराम सिंग (४३) याचा त्या वाहनावरील ताबा सुटल्याने तो ट्रेलर मुंब्रा बायपास रोड वर उलटल्याची घटना गुरुवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास समोर आली. या उलटलेल्या ट्रेलरने ठाण्याकडून मुंब्राकडे जाणाऱ्या लेनवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. ही कोंडी जवळपास दोन ते अडीच तासांनी सुटली. या घटनेत चालक बुदराम सिंग यांच्या दोन्ही पायाला,कमरेला आणि खांद्याला किरकोळ दुखापत झाल्याची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

जखमी चालक सिंग हा हरियाणा येथून नवी मुंबई, कळंबोली येथे ३१ टन वजनाची लोखंडी प्लेट घेऊन निघाला होता. ट्रेलर मुंब्रा बायपास रोडने जाताना चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि तो ट्रेलर ठाण्याकडून मुंब्राकडे जाणाऱ्या वाहिनीवर उलटला. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, मुंब्रा शहर वाहतूक पोलीस व अग्निशमन दलाचे जवान हे दाखल झाले. यावेळी चालक जखमी झाला असून या अपघाताने ठाण्याकडून मुंब्राकडे जाणाऱ्या लेनवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाल्याचे समोर आले। तातडीने उलटलेला ट्रेलर २ क्रेनच्या साह्याने रस्त्याच्या एका बाजूला केला. तसेच तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २२ जानेवारी २०२४ | पान : ३
www.diwanews.com

## मुद्रांक शुल्क अभय योजनेचा नागरिकांनी लाभ घ्यावा

**ठाणे :** शासनाने मुद्रांक शुल्क व दंड सवलत 'अभय योजना २०२३' लागू केली आहे. ही योजना १ डिसेंबर ते ३१ जाने.२०२४ आणि १ फेब्रु. ते ३१ मार्च, अशा दोन टप्यात लागू केलेली आहे. या योजनेमध्ये १ जाने/ १९८० ते ३१ डिसें.२००० या कालावधीत नोंदणी दाखल केलेले किंवा न केलेले दस्त यांच्याबाबतीत शासनास देय होणाऱ्या तथा वसुलीपात्र संपूर्ण मुद्रांक शुल्क आणि त्यावर लागू होणाऱ्या दंडामध्ये सूट तथा सवलत लागू करण्यात आली आहे, अशी माहिती मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे (शहर) नारायण राजपूत व मुद्रांक जिल्हाधिकारी ठाणे (ग्रामीण) ओमप्रकाश जांभळे यांनी दिली

# बेशिस्त रिक्षाचालक व वाहनचालकांवर कारवाई करण्याबाबत दिवा मनसेचे वाहतूक पोलिसांना निवेदन





अध्यक्ष: श्री. राजसाहेब ठाकरे
महाराष्ट्र नवनिर्माण सेना
श्री.तुषार भास्कर पाटील
शहर अध्यक्ष, दिवा

दिनांक – १८/०१/२०२४

प्रति
शहर वाहतूक उपविभाग , मुंब्रा
ठाणे - ४००६१२

विषय :- दिव्यातील बेशिस्त वाहनचालक आणि रिक्षाचालक तसेच विना परवाना व भंगार झालेल्या (स्क्रॅपच्या) रिक्षा चालवणाऱ्या रिक्षाचालकांवर कठोर कारवाई करणे तसेच दिव्यातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी वाहतुकीत आवश्यक ते बदल करणेबाबत

सन्माननीय महोदय,

दिव्यातील वाहतूक व्यवस्थेबाबत आम्ही वेळोवेळी वाहतूक विभागाशी पत्रव्यवहार करत आलेलो आहोत. काही दिवसांपूर्वी दिवा चौकात होणाऱ्या वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी दिव्यात सायंकाळी ७.०० ते रात्री ९.०० या वेळेत वाहतूक पोलीस नेमण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. त्या पत्रास प्रतिसाद देत वाहतूक विभागाने एक अंमलदार आणि दोन वॉर्डन यांची नेमणूक करण्यात आली होती. वाहतूक पोलिसांच्या नुसत्या असण्याने दिवा चौकातील वाहतूक कोंडी नियंत्रणात आलेली होती. पण नेहमीप्रमाणे काही दिवस झाल्यानंतर वाहतूक पोलीस दिसेनासे झाले. ज्यामुळे पुन्हा दिवा चौक ते दिवा रेल्वे स्टेशन फाटकापर्यंत संपूर्ण वाहतूक व्यवस्था कि कोलमडलेली आहे. बेशिस्त वाहतूक कोंडी होण्यास सुरवात झाली आहे. रांगेत रिक्षाचालकांनी संपूर्ण रेल्वे फाटक परिसर हा व्यापून टाकलेला असून रेल्वे पादचारी पुलासमोर वाकड्या तुकड्या रिक्षा उभ्या केल्या जातात. रांगेत रिक्षा उभ्या न करणे, मनमानी पद्धतीने रस्ता अडवून उभे राहणे, बॅच किंवा गणवेश परिधान न करणे, विना परवाना रिक्षा चालवणे, मोडकळीस आलेल्या(स्क्रॅपच्या) रिक्षांमधून प्रवासी वाहतूक करणे, जवळची भांडी नाकारणे यासारखे प्रकार दिवा शहरात सर्रास सुरु आहेत. अशा रिक्षाचालकांवर वाहतूक पोलिसांनी तात्काळ आणि कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

त्याच बरोबर दिवा स्टेशन मार्गावर वाहतुकीत थोडेसे बदल केले गेल्यास रेल्वे फाटकाजवळ होणारी वाहतूक कोंडी देखील दूर होण्यास मदत होईल. उदा. रेल्वेचे सरकते जिने जिथे उतरतात त्याच्या समोर असलेले रिक्षा स्टॅन्ड थोडे मागे सरकवून, साबे गावात जाणाऱ्या वाहनांसाठी तलावाच्या बाजूने मार्गिका सुरु केल्यास फाटक परिसरात होणारी वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होईल. सदर रस्त्यावर असलेली फेरीवाल्यांची गर्दी दूर करण्यासाठी पालिकेचे सहकार्य घेता येईल. तसेच मुंब्रादेवी कॉलनी मध्ये जाणाऱ्या रिक्षांचे स्टॅन्ड एका बाजून बॅरिकेडिंग करून रीतसर सुरु केल्यास रिक्षा एका रांगेत उभ्या राहतील परिणामी वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. तसेच आर.के. बाझार च्या पूर्वी असलेल्या मच्छी मार्केट जवळील वाहतूक हि एकाच बाजूने होते. महानगरपालिके कडून सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर रस्त्यावरील वाहतूक पुन्हा पूर्वीसारखी दोन्ही बाजूने सुरु केल्यास वाहतूक कोंडी नक्कीच कमी होईल. वरील सर्व सूचनांचा आपण गांभीर्याने विचार करावा तसेच यासंदर्भात आपण स्वतः एकदा संपूर्ण दिवा परिसराची पाहणी करावी अशी आम्ही आपणांस या पत्राच्या माध्यमातून विनंती करत आहोत. तरी आपण यावर लवकरच उचित ती कार्यवाही कराल अशी आशा बाळगतो.

धन्यवाद...!

पोलीस ठाणे अंमलदार,
शहर वाहतुक उपविभाग, मुंब्रा
17/01/2024
14:15वा.

आपला नम्र
तुषार पाटील
तुषार भास्कर पाटील

कार्यालय: आमदार कार्यालय, शॉप नं. २, चंद्रांगण रेसिडेन्सी, दिवा-शिळ रोड, दिवा स्टे.(पूर्व)
दूरध्वनी: ७९७७५५३५३५ / ९८२०६९८१३१

**दिवा:-**शहरातील वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर मनसेचे दिवा शहर अध्यक्ष तुषार पाटील यांनी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश खेडेकर यांची भेट घेतली. दिवा -शीळ रस्त्यावरील दिवा चौक ते दिवा रेल्वे फाटका पर्यंतची संपूर्ण वाहतूक व्यवस्था ही कोलमडलेली आहे. दिवा रेल्वे फाटक परिसर हा बेशिस्त रिक्षाचालकांनी अक्षरशः व्यापून टाकलेला आहे. रेल्वे पादचारी पुलाच्या समोर वाकड्यातिकड्या रिक्षा उभ्या केल्या जातात, ज्यामुळे लोकांना रेल्वे स्थानकातून बाहेर पडणे जिकरीचे होते. त्याशिवाय मनमानी पद्धतीने कुठेही रिक्षा उभ्या करणे , रिक्षा रांगेत न लावणे, बॅच किंवा गणवेश परिधान न करणे , विना परवाना रिक्षा चालवणे, मोडकळीस आलेल्या (स्क्रॅप) रिक्षांमधून प्रवाशांची वाहतूक करणे, जवळच्या ठिकाणची भाडी नाकारणे असे प्रकार दिवा शहरात सर्रास सुरू आहेत. त्यामुळे अशा रिक्षाचालकांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी दिवा मनसे कडून करण्यात आलेली आहे.

सोबतच दिवा शहरातील वाहतुकीचे योग्य नियमन केले गेल्यास शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल असेही मनसेने आपल्या पत्रात म्हटले आहे. यावेळी त्यांच्या सोबत शहर सचिव प्रशांत गावडे, विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील आणि उपविभाग अध्यक्ष गणेश भोईर हेही उपस्थित होते.

# मुंब्र्यातील दहावीच्या परिक्षार्थींची परीक्षा केंद्रे पाच किलोमीटरवर

## ऋताताई आव्हाड यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांनाच घातले साकडे

**ठाणे–** दहावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्र हे घरापासून जवळ असावेत, असे संकेत आहेत. मात्र, मुंब्रा परिसरातील अनेक विद्यार्थ्यांचे परीक्षा केंद्र हे घर आणि त्यांच्या शाळेपासून सुमारे पाच किमी अंतरावर देण्यात आले आहेत. शहरातील वाहतूक कोंडीत जर विद्यार्थी अडकले तर त्यांना वेळेवर परीक्षा केंद्र गाठणे अशक्य ठरणार असल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता असल्याने राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या ठाणे-पालघर विभागिय अध्यक्षा ऋताताई आव्हाड यांनी थेट जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनाच साकडे घातले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात शिक्षण विभागाशी बोलून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे.

मुंब्रा भागातील दहावीच्या अनेक विद्यार्थ्यांना रेल्वे स्टेशनपासून ४ ते ५ किमी अंतरावर असलेल्या कौसा, देवरी पाडा आदी भागात परीक्षा केंद्रे देण्यात आली आहेत. राहत्या घरापासून सुमारे पाच किमी अंतरावर ही केंद्रे असल्याने विद्यार्थ्यांचा अधिकचा वेळ आणि पैसा खर्च होणार आहे. या संदर्भात पटेल शाळेचे शिक्षक अब्दुल रेहमान आणि ईसराईल खान यांनी प्रशासनाशी अनेकवेळा संपर्क साधून केंद्र बदलण्याची विनंती केली होती. मात्र, त्यावर काहीही तोडगा निघत नव्हता.

अखेर ही बाब ऋताताई आव्हाड यांना समजल्यानंतर त्यांनी तत्काळ दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधला. जिल्हाधिकाऱ्यांनीही याबाबत लवकरात लवकर तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

दरम्यान, ऋताताई आव्हाड यांनी सांगितले की, इयत्ता १०वी आणि १२वीच्या मुलांसाठी परीक्षा केंद्र घरापासून जवळ असले पाहिजे. मात्र, सध्या देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रांमुळे विद्यार्थ्यांची मोठी अडचण होणार आहे. शहरात सध्या वाहतूक कोंडीची मोठी समस्या आहे. या कोंडीत अडकल्यास साधारणपणे तीन किमीचे अंतर कापायला किमान एक तास लागत असतो. शिवाय, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही सक्षम नसल्याने विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसानही होण्याची शक्यता आहे. या प्रवासात थकलेला विद्यार्थी परीक्षेस कसा सामोरे जाईल, असा प्रश्न निर्माण होत असल्याने प्रशासनाने तत्काळ परीक्षा केंद्रांमध्ये बदल करावा, अशी मागणी ऋताताई आव्हाड यांनी केली आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २२ जानेवारी २०२४


# ठाण्यात मैदान उपलब्ध होत नसतील तर मुंबईत यावे, मैदान उपलब्ध करून देऊ – संजय नाईक

**ठाणे: आंतरशालेय क्रिकेट स्पर्धा या क्रिकेटच्या बेस स्पर्धा आहेत. त्यातच ही स्पर्धा सलग ४७ वर्षे खेळवणे, हे मोठे काम आहे. या स्पर्धेमुळे भारतीय क्रिकेट संघाला चांगले खेळाडू मिळाले आहेत. तसेच ठाणे शहरामध्ये आंतर शालेय क्रिकेट स्पर्धा खेळण्यासाठी जर मैदान उपलब्ध होत नसतील तर आयोजकांनी मुंबईत यावे, त्यांच्यासाठी उपलब्ध असतील ते – ते मैदान अशा स्पर्धांसाठी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन मुंबई क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष संजय नाईक यांनी ठाण्यात बोलताना केले.**




ठाण्याच्या दादोजी कोंडदेव स्टेडियम वरील मैदानावर खेळविण्यात आलेल्या ठाण्यातील प्रसिद्ध ४६ व्या एन.टी.केळकर स्मृति आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. त्यावेळी नाईक बोलत होते. शुक्रवारी मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृहात खेळल्या गेलेल्या १६ वर्षांखालील स्टार स्पोर्टस् क्लब आयोजित एन. टी. केळकर स्मृती आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत श्री माँ विरुध्द वसंत विहार स्कूल यांच्यात अंतिम सामना रंगला. श्री माँ विद्यालयाने वसंत विहार स्कूलचा पराभव करत एन. टी. केळकर चषकावर आपले नाव कोरले. सलग दुसऱ्या वर्षी श्री माँ विद्यालयाने चषक जिंकण्याची किमया केली आहे. ही स्पर्धा मुंबई क्रिकेट असोसिएशन संलग्न, ठाणे म हानगरपालिका पुरस्कृत व डोंबिवली क्रिकेट क्लब असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

४५ षटकांच्या या स्पर्धेत वसंत विहार संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. वसंत विहार संघाला श्री माँ विद्यालयाच्या गोलंदाजांनी सुरुवातीला चांगलेच धक्के दिले.

मात्र सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या जयस्वा कोठारी याने चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडत ६८ धावा केल्या. वसंत विहार संघाने ३४.३ षटकात १० बाद १२७ धावा केल्या. श्री माँ संघाचे गोलंदाज आदित्य कौलगी ४ बळी, रुग्वेद जाधव ३ बळी तर अद्विक मंडलीक याने २ गडी बाद केले. १२७ धावांचा पाठलाग करतांना श्री माँ विद्यालयाच्या रुजुल रांजणे आणि कामेश जाधव या फलंदाजांनी चांगली सुरुवात केली. अथर्व सुर्वे ३३ धावा, आदित्य कौलगी नाबाद २२ धावा, कामेश जाधव १६ धावा, रुजुल रांजणे याने १५ धावा केल्या. श्री माँ संघाने हा सामना ४२.५ षटकात ६ फलंदाजांच्या मोबदल्यात जिंकला.

स्पर्धेचे आयोजक आमदार संजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मुंबई क्रिकेट असोसिएशन चे उपाध्यक्ष संजय नाईक यांचे विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी कोकण पदवीधर चे आमदार निरंजन डावखरे ,सेंट्रल मैदान कमिटीचे अध्यक्ष डॉ.राजेश मढवी, स्टेडियमच्या व्यवस्थापक मिनल पालांडे, ठाणे जिल्हा हौसिंग सोसायटी फेडरेशन चे अध्यक्ष सीताराम राणे, ठाणे परिवहन सदस्य विकास पाटील, डोंबिवली क्रिकेट क्लब असोसिएशन चे सेक्रेटरी एम.डी.मराठे, अध्यक्ष जयंत वेलदे , सदानंद केळकर आदी उपस्थित होते बाळाराम खोपकर यांनी सूत्रसंचालन केले.

## एकाच मालकाच्या चार गाड्यांना आग
### तीन दुचाकींचा समावेश

ठाणे: श्रीरंग सोसायटी या ठिकाणी बिल्डिंग क्रमांक सी डी-६३ च्या तळमजल्यावरती पार्क केलेल्या एक चारचाकी आणि तीन दुचाकी अशा चार वाहनांना आग लागल्याची घटना बुधवारी पहाटे साडेचार ते पाच वाजण्याच्या सुमारास समोर आली. आगीत त्या गाड्या जळून खाक झाली असून चार ही गाड्या एकाचा असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

पार्क केलेल्या वाहनांना आग लागल्याची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दल , आपत्ती व्यवस्थापन आणि राबोडी पोलीस या विभागांनी धाव घेतली. अग्निशमन विभागाने तातडीने आगीवर नियंत्रण मिळविण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू केले. त्यानंतर कुठे ही आग अर्ध्यातास नियंत्रणात आली. मात्र या आगीत त्या चार गाड्यांचे नुकसान झाले आहे. यामध्ये एका इलेक्ट्रिक दुचाकीचा समावेश असल्याचे आपत्ती व्यवस्थापन कक्षाने सांगितले.



## कोपरखैरणे विभागात विनापरवानगी बांधकामांवर तोडक कारवाई

**नवी मुंबई –** नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभागांतर्गत १) श्री.अहिरे सुमंत सोपान, टाईप,रूम नं ४९०,सेक्टर-१८,कोपरखैरणे . २) श्रीम.सुप्रिया महेश इंदुलकर व महेश अरुण इंदुलकर टाईप,रूम नं ४९१,सेक्टर- १८, कोपरखैरणे ३) श्री.भीमराव शिवाजी काळे व अनिता भीमराव काळे, टाईप, रूम नं ४८९, सेक्टर- १८, कोपरखैरणे यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. त्यांनी महानगरपालिकेची कोणतीही पूर्व परवानगी न घेता अनधिकृतरित्या पोटम ळ्याचे बांधकाम केले होते.

सदर अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करून त्यांच्यामार्फत करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाकडील अधिकारी/कर्मचारी, न.मुं.म.पा पोलीस बंदोबस्त तसेच,६ मजूर , १ पिकअप व्हॅन, २ इलेक्ट्रॉनिक हॅमर , गॅस कटर १ इत्यादी चा वापर करण्यात आला, यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २२ जानेवारी २०२४ पान : ५
www.diwanews.com

# विकसित भारत संकल्प यात्रेची सांगता



## विकसित भारत संकल्प यात्रेचा १ लाखाहून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

















**ठाणे :** केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचे लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचावेत यासाठी ठाणे महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मर्गदर्शनाखाली २८ नोव्हेंबर २०२३ पासून सुरू झालेल्या विकसित भारत संकल्प यात्रेची सांगता आज १८ जानेवारी २०२४ दिवा शहरात झाली. गेल्या तीन महिन्यात ठाणे शहरातील विविध ७४ ठिकाणी आयोजित केलेल्या या यात्रेचा लाभ १ लाखाहून अधिक नागरिकांनी घेतला आहे. विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून पीएम उज्वला, आयुष्यमान भारत कार्ड, आधार कार्ड नोंदणी व अपग्रेडेशन, पी एम स्वनिधी, प्रधानमंत्री आवास योजना, अर्बन ई बस अशा विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांनी घेतली असून त्याबाबतची नोंदणी करण्यात आली आहे.

ठाणे शहरात विविध ७४ ठिकाणी झालेल्या विकसित संकल्प भारत यात्रेस महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे यांच्यासह महापालिकेचे सर्व उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

आज दिवा विभागात दोन ठिकाणी विकसित भारत संकल्प यात्रेच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. दिवा रेल्वे स्टेशन गावदेवी मैदानासमोरील मंदिर तसेच बीएसयूपी बिल्डींग मैदान, पडले गाव या ठिकाणी विकसित भारत संकल्प यात्रेची सांगता आज करण्यात आली. यावेळी राज्यसभा, गोवा प्रदेश खासदार सदानंद तनावडे, महापालिकेचे उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, सहाय्यक आयुक्त अक्षय गुडधे, समन्वयक अधिकारी आधार कुलकर्णी, प्रकल्प अधिकारी डॉ. समीर शहा, कार्यालयीन अधीक्षक भालचंद्र घुगे उपस्थित होते.

यावेळी गोवा प्रदेशचे राज्यसभा खासदार सदानंद तनावडे यांनी नागरिकांशी संवाद साधला तसेच विकसित भारत यात्रेच्या माध्यमातून शासन राबवित असलेल्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहविण्याचे काम करण्यात आले असून या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. तसेच दुपारी १२.३० वा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांशी संवाद साधला, तसेच शासन राबवित असलेल्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांना कशा प्रकारे उपयुक्त ठरत आहे हे देखील जाणून घेतले.

ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध प्रभाग समिती कार्यक्षेत्रात आतापर्यंत एकूण ७४ ठिकाणी या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते, या यात्रेच्या ठिकाणी आरोग्य शिबिर, क्षयरोग तपासणी करुन नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले तसेच आवश्यक औषधेही उपलब्ध करुन दिली याचाही लाभ घेतला.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २२ जानेवारी २०२४ पान : ६
www.diwanews.com




# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दावोस दौरा यशस्वी

## जागतिक आर्थिक परिषदेत ३ लाख ५३ हजार कोटींपेक्षा जास्त सामंजस्य करार स्वाक्षांकित – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रामध्ये परदेशी गुंतवणूक करण्याचा ओढा मोठ्या प्रमाणात दिसून आला असून या वर्षी ३ लाख ५३ हजार कोटी रूपयांपेक्षा जास्त परदेशी गुंतवणुकीचे सामंजस्य करार स्वाक्षांकित झाले. त्याचप्रमाणे, जवळपास एक ते दीड लाख कोटी रुपयांचे आणखी सामंजस्य करार स्वाक्षरीत होण्यासाठी परदेशी कंपन्यांनी स्वारस्य दाखविले असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत सांगितले.

जागतिक आर्थिक परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राज्य व केंद्र शासनाचे शिष्टमंडळ दावोस येथे गेले होते. तेथून परतल्यानंतर मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. मुख्यमंत्र्यांचे स्वागत करण्यासाठी मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अमेरिका, स्वित्झर्लंड, सिंगापूर, दक्षिण कोरीया या देशांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या असून यूएई, ओमान या देशांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास पसंती दर्शवली आहे. त्याचबरोबर आर्सेलर मित्तल, जिंदाल, गोदरेज, अदानी या कंपन्यांनी सुद्धा महाराष्ट्रात गुंतवणुकीची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे एकंदरीतच दावोस दौरा यशस्वी झाला असल्याचे मत मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले की, मागील वर्षी दावोस येथे झालेल्या सामंजस्य करारापैकी ७५ ते ८० टक्के करार कागदावर न राहता प्रत्यक्षात आले. या करारामुळे २ लाखांपेक्षा जास्तीचे रोजगार निर्माण होणार आहे. जेम्स आणि ज्वेलरी, माहिती तंत्रज्ञान, हरित हायड्रोजन, हरित ऊर्जा, पेपर आणि पल्प, खाण उद्योग अशा अनेक उद्योजकांनी डेटा सेंटर, इन्फ्रास्ट्रक्चर अशा विविध सेक्टरमध्ये गुंतवणूक केली आहे. जेम्स आणि ज्वेलरी उद्योगात १ लाखांपेक्षा जास्त रोजगार निर्माण होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

केंद्र आणि राज्य सरकारच्या समविचारी संबंधामुळे उद्योजक हे आत्मविश्वासाने मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुंतवणूक करत असल्याचा अनुभव मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात पायाभूत सुविधा, दळणवळणाच्या उत्तम सुविधा, कुशल मनुष्यबळ असून महाराष्ट्रात एक इको सिस्टिम आहे. त्याचबरोबर देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे व्हिजन, डॉयनॅमिक लिडरशीप, ग्लोबल लिडर म्हणून त्यांची ओळख झाली असल्याचे दावोस दौऱ्यात अनेक देशातील लोकांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे नाव जगभरात असून त्यांचे नाव लोक आदराने घेतात. परदेशी गुंतवणुकीसाठी याचाही फायदा महाराष्ट्राला झाला असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

# आयुर्वेद प्रसारासाठी अधिक प्रयत्नांची गरज

## केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांचे मत

**ठाणे –** विश्वामध्ये अनेक चिकित्सा आहेत, परंतु आयुर्वेद ही पद्धती विशेष आहे. आयुर्वेदासाठी आणखीन प्रयत्न केल्यास जगात आयुर्वेद आपण आणखी पुढे नेऊ शकतो, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांनी व्यक्त केले.

आयुर्वेद सर्वांसाठी–जीवनशैलीजन्य विकारांच्या व्यवस्थापनातील नवीन दृष्टिकोन या विषयावर आयुष मंत्रालय, भारत सरकारतर्फे ठाण्यात राष्ट्रीय आरोग्य मेळा आणि एआयएसी कॉन, २०२४ आयोजित करण्यात आले आहे. याचा शुभारंभ श्री.नाईक यांच्या हस्ते आज झाला. त्यावेळी ते बोलत होते.

मी आयुष मंत्री असताना जो सन्मान तुम्ही मला दिला त्याच्यापेक्षाही जास्त सन्मान आजच्या कार्यक्रमामुळे मला दिला आहे, असे प्रारंभी नमूद करून श्रीपाद नाईक पुढे म्हणाले की, जगामध्ये अनेक चिकित्सा पद्धती आहेत, परंतु आधुनिक जीवन आणि वेद अर्थात ज्ञान व जीवन कशाप्रकारे जगायचे हे सांगणे म्हणजे आयुर्वेद होय. आधुनिक जीवन जगताना आपल्या मूळ सिद्धांतावरच यावेच लागेल. कोरोनासारखे अनेक शत्रू यापुढेही हल्ला करण्यास सज्ज आहेत, अशावेळी आयुर्वेद सक्षम करणे गरजेचे आहे, असे ते शेवटी म्हणाले.

भारतात सर्वात जास्त आयुर्वेदिक महाविद्यालय महाराष्ट्रमध्ये आहेत. त्यामुळे इथे एक स्वतंत्र आयुर्वेदिक विद्यापीठ व्हावे तसेच प्रत्येक बाळासाहेब ठाकरे दवाखान्यात आयुर्वेदाचा समावेश होणे गरजेचे आहे असे मत महासंमेलानाचे अध्यक्ष पद्मश्री, पद्मभूषण वैद्य देवेंद्र त्रिगुणा (अध्यक्ष, राष्ट्रीय आयुर्वेदिक विद्यापीठ आणि अखिल भारतीय आयुर्वेदिक महासंमेलन ट्रस्ट) यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर मुंबईत मरिन ड्राइव्ह परिसरात एक जुने मित्तल आयुर्वेदिक महाविद्यालय आहे ते बंद होण्याच्या मार्गावर आहे यात मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे आणि ती जागा आयुर्वेदाच्या कामासाठी उपयोगात आणावी अशी विनंती त्यांनी यावेळेस केली.

बदलत्या जीवनशैलीमुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर आयुषच्या माध्यमातून काही सुयोग्य हस्तक्षेप करून होणारे दीर्घकालीन नुंकसान रोखण्याचा प्रयत्न आहे असे श्री आयुष मंत्रालयाचे सचिव पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा या संमेलनात म्हणाले. आयुर्वेदिक शास्त्रातील उपायांचा आधुनिक वैद्यक उपचार पद्धतीत उपयोग करून रुणाची प्रतिकारशक्ती वाढवताना रोगाच्या मुळाशी जाण्याचे प्रयत्न सुरु आहेत , असे ही ते पुढे म्हणाले. पथ्य- अपथ्य, दिनचर्या, ऋतुचर्या, पंचकर्म आणि अन्य उपचारपद्धतींचा संतुलित वापर केल्याने समाज स्वास्थ्य सुधृढ राहू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्रालयाच्या सचिव आरती अहुजा यांनी आपल्या भाषणात यापुढे कामगार रुणालयांमध्ये आयुर्वेद उपचारासाठी ५० रुणशय्या ठेवण्यात येणार असल्याचे सांगितले. सार्वजनिक आरोग्य म्हणजे केवळ उपचार नसून प्रतिबंध करणे महत्वाचे असते. आजारावर प्रतिबंध आण्याची क्षमता ही केवळ आयुर्वेद मध्ये आहे असे देखील त्या यावेळेस म्हणाल्या.

यावेळी अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाची मोबाईल ॲप पत्रिका आणि २०२४ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आयुर्वेदासाठी विशेष कार्य करणाऱ्यांना यावेळी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या महासंमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून महासंमेलानाचे अध्यक्ष पद्मश्री, पद्मभूषण वैद्य देवेंद्र त्रिगुणा (अध्यक्ष, राष्ट्रीय आयुर्वेदिक विद्यापीठ आणि अखिल भारतीय आयुर्वेदिक महासंमेलन ट्रस्ट) ,आयुष मंत्रालयाचे सचिव पद्मश्री वैद्य राजेश कोटेचा, वैद्य जयंत देवपुजारी (चेअरमन, नॅशनल कमिशन फॉर इंडियन सिस्टम्स ऑफ मेडिसीन), डॉ. मनोज नेसारी (ॲडव्हायजर (आयुर्वेद) मिनिस्ट्री ऑफ आयुष, भारत सरकार) आणि वैद्य राकेश शर्मा (प्रेसिडेंट, बोर्ड ऑफ इथिक्स अँड रजिस्ट्रेशन, एनसीआयएसएम), वैद्य मनोज, वैद्य रामदास आव्हाड आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. रमण गुंडाळकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानल्यानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.

या महासंमेलनात तणाव निमंत्रण, वेदना व्यवस्थापन, योग आणि आयुर्वेद, संधिविकार व्यवस्थापन, योग आणि सत्वावजय चिकित्सा, स्वस्थ जीवनासाठी आयुर्वेद, आयुर्वेदातून रोगप्रतिकारशक्ती, आयुर्वेदातील त्वचा व केसांची काळजी, स्त्री विकारांचे व्यवस्थापन, पचन विकारांचे व्यवस्थापन आयुर्वेदिक दिनचर्या व स्वास्थ्यपूर्ण आहार, सामान्य जीवनशैलीजन्य विकारांचे व्यवस्थापन या विषयांवर आयुर्वेदिक तज्ज्ञांची मार्गदर्शक व्याख्याने होणार आहेत.

नागरिकांसाठी, कायचिकित्सा/जनरल मेडिसीन, त्वचाविकार, योग व डाएट, सर्जरी, स्त्रीरोग, बालरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा आदी आजारांवर मोफत रुण तपासणी, आयुर्वेदिक सल्ला-ओपीडी उपलब्ध असून, आयुर्वेदिक तज्ज्ञांमार्फत ही तपासणी विनामूल्य केली जाणार आहे. ठाण्यातील राम गणेश गडकरी रंगायतन व श्री समर्थ सेवक मंडळ, डॉ. मूस मार्ग, ठाणे पश्चिम येथे १९ ते २२ जानेवारी २०२४ दरम्यान हे आयुर्वेदिक महासंमेलन सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत संपन्न होत आहे. मैदानात ५५ नामांकित आयुर्वेदिक औषधांचे स्टॉल्स आहेत, जे नागरिकांना सवलतीच्या दरात आयुर्वेदिक औषध उपलब्ध करून देतील. या सुवर्णसंधीचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.




# 'मैं अटल हूं' चित्रपट पाहून ठाणेकर रसिक गहिवरले!

भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांच्याकडून विशेष शोचे आयोजन

**ठाणे :** भारतरत्न, श्रद्धेय स्व. अटलबिहारी वाजपेयी यांची जीवनकहाणी उलगडणारा मै अटल हूं हा बायोपिक चित्रपट पाहून ठाण्यातील रसिक गहिवरले. अटलबिहारी वाजपेयींचा संघर्षापासून पंतप्रधानपदापर्यंत झालेला प्रवास आणि त्यांची देश व जनतेप्रती समर्पित भावना पाहून अनेकांच्या डोळ्यात आसवे आली.

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जीवनावर मै अटल हूं हा बायोपिक प्रदर्शित झाला. नव्या पिढीला हा बायोपिक पाहून स्व. अटलजींपासून प्रेरणा घेता येतील, या उद्देशाने भाजपाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या वतीने ठाण्यातील मूव्ही मॅक्स चित्रपटगृहात नागरिकांसाठी मोफत विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. त्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चित्रपटगृह पूर्णपणे भरल्यामुळे अनेक नागरिकांना परतावे लागले. या वेळी माजी खासदार विनय सहस्रबुद्धे, आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, माजी नगरसेविका स्नेहा आंब्रे, बायोपिकचे दिग्दर्शक व ठाण्यातील रहिवाशी रवी जाधव यांची उपस्थिती होती.

श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी यांचे देशाप्रती समर्पण, त्यागाची भावना, संसदेतील भाषणे, संसदेच्या आवारात बैलगाडीने आगमन आदींबरोबरच राम जन्मभूमीवरील आंदोलन, पोखरण अणुस्फोट, पाकिस्तानबरोबरील चर्चा आणि वाजपेयींचे वैयक्तिक जीवनाचे विविध कंगोऱ्यावर बायोपिकमध्ये प्रकाश टाकण्यात आला. त्याला रसिकांनी पसंती दिली. भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या निधनाला पाच वर्ष उलटल्यानंतरही, त्यांच्या विचारांची मोहिनी अजूनही तरुण पिढीवर कायम आहे, अशी भावना श्री. विनय सहस्रबुद्धे यांनी व्यक्त केली. तर युवा पिढीला अटलजींचे कर्तृत्व दाखविण्यासाठी आजचा प्रयोग आयोजित केला असल्याचे आमदार निरंजन डावखरे यांनी सांगितले. ठाण्यातील रहिवाशी व चित्रपटाचे दिग्दर्शक रवी जाधव यांनी अटलजींवर सुंदर चित्रपट साकारला आहे, याचा अभिमान वाटतो, असे श्री. डावखरे म्हणाले.



# मराठी भाषा, संस्कृतीच्या प्रचार-प्रसारासाठी ग्रंथ प्रदर्शन

**नवी दिल्ली :** मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून हा उपक्रम स्तुत्य असल्याचे महाराष्ट्र सदनाचे सहायक निवासी आयुक्त डॉ. राजेश अडपावार यांनी केले.

कस्तुरबा गांधी मार्गस्थित महाराष्ट्र सदन येथे पुस्तक विक्री प्रदर्शन उद्घाटनाप्रसंगी सहायक निवासी आयुक्त डॉ. अडपावार बोलत होते. ते म्हणाले की, मराठी भाषेचा राजधानीत प्रचार व प्रसार व्हावा, तसेच मराठी भाषेच्या संवर्धनासाठी राज्यशासनाकडून मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यासारखे विविध उपक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून राजधानीत ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र सदन आणि महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' राबविण्यात येत आहे. या अंतर्गत महाराष्ट्र सदन येथे ग्रंथ विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सहायक निवासी आयुक्त डॉ. प्रतिमा गेडाम, स्मिता शेलार यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी आणि सदनातील अभ्यागत उपस्थित होते.

मराठी भाषा संवर्धन हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नाही तर एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. ग्रंथ प्रदर्शन हे अभिनव आणि उपयुक्त उपक्रम असल्याचे सांगून डॉ.अडपावार पुढे म्हणाले, यामुळे मराठी भाषा आणि संस्कृतीचे महत्त्व अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

या ग्रंथ प्रदर्शनात रसिक साहित्य प्रकाशन,पॉप्युलर प्रकाशन, डायमंड बुक्स, साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट आणि भारतीय साहित्य कला प्रकाशन दालने आहेत. साहित्य, संस्कृती, अर्थविषयक, राजकीय, ऐतिहासिक, वैचारिक अशा विविध विषयांवर आधारित सुप्रसिद्ध लेखकांसह, नवोदित लेखकांची पुस्तके मांडण्यात आली आहेत. पुढील दोन दिवस सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत हे ग्रंथ विक्री प्रदर्शन सुरु राहणार आहे. राजधानीतील मराठी लोकांनी या ग्रंथ प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन महाराष्ट्र सदन आणि परिचय केंद्राकडून करण्यात येत आहे.याठिकाणी परिचय केंद्राच्या वतीने 'लोकराज्य' मासिकाचे दालनही मांडण्यात आले आहे.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने महाराष्ट्र सदन व महाराष्ट्र परिचय केंद्राच्या दर्शनीय परिसरात मराठीमध्ये. सुविचार लिहिले जात आहेत.

ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनाप्रसंगी सहायक निवासी आयुक्त डॉ. अडपावार यांचे स्वागत उपसंचालक श्रीमती अरोरा यांनी रोपटे देऊन केले. यावेळी सर्व सहभागी प्रकाशकांना रोपटे भेट देऊन स्वागत करण्यात आले.

दिवा न्यूज
वाचा दर सोमवारी



आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २२ जानेवारी २०२४






# दिव्यात शिवसेना आयोजित भव्य रामरथाची मिरवणूक संपन्न







**दिवा:–** दिवा शहरातील साबेगाव येथील विठ्ठल मंदिर साबेगाव,पासुन दिवा रेल्वे फाटक, मुंब्रा देवी कॉलोनी, दातिवली रोड, दातिवली तलाव, बेडेकर नगर, म्हात्रे गेट, दातिवली चौक, धर्मवीर नगर, दिवा चौक, दिवा स्टेशन रोड,या मार्गाने श्री.रामरथाची भव्य मिरवणूक उत्साहात काढण्यात आली होती. दिवा शहरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात या मिरवणुकीत गर्दी केली होती. शिवसेनेचे दिवा शहरप्रमुख मा.उपमहापौर रमाकांत मढवी यांनी श्रीराम रथाची पूजन केले होते. यावेळी नागरिकांनी व महिलांनी फुलांची उधळण करीत जय श्रीरामच्या घोषणा करत होते. यावेळी शिवसेना उपशहरप्रमुख मा.नगरसेवक शैलेश पाटील, अमर पाटील, दीपक जाधव, आदेश भगत, निलेश पाटील, उमेश भगत, सुनिता गणेश मुंडे, अर्चना पाटील, मा.नगरसेविका दिपाली उमेश भगत, दर्शना चरणदास म्हात्रे, युवा अधिकारी साक्षी मढवी, चरणदास म्हात्रे, भालचंद्र भगत, शशिकांत पाटील, विनोद मढवी, चंद्रसेन यादव, जगदीश भंडारी, यांच्यासह अनेक शिवसेनिक पदाधिकारी व दिवेकर मोठ्या संख्येने मिरवणूकीत उपस्थित होते.



